N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे पैठण

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण    **P.S.(ठाणे):** पैठण

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0285    **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/08/2025 00:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 04/08/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/08/2025
   **Time From (वेळेपासून):** 16:05 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 00:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 05/08/2025    **Time (वेळ):** 00:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 001
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/08/2025 00:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसील कर्यालय परीसर पैठण येथे, पैठण

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): शाकेर सत्तार शेख

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अबरार कलनी बिड बायपास,छत्रपती संभाजीनगर ,पैठण,औरंगाबाद ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अबरार कलनी बिड बायपास,छत्रपती संभाजीनगर ,पैठण,औरंगाबाद ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9921768383

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सोमनाथ राघु कोल्हे | | | 1. आपेगाव ,पैठण,पैठण,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | अक्षय बबनराव बिनीवाल | | | 1. पिरवाडी,बदनापुर,बदनापूर, जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 8000/ रु रोख रक्कम | 8,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

8,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक:- 04/08/2025

मी शाकेर सत्तार शेख वय 34 वर्ष व्यवसाय चालक रा. आपेगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर, ह.मु. अबरार कॉलनी बिड बायपास छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 9921768383

मी दिनांक 01/08/2025 रोजी अँन्टी करप्शन ऑफिस येथील लँडलाईन नंबर 02402334045 यांचेवर फोन करुन एस.पी. मॅडम यांना मी फोनद्वारे माझी तक्रार सांगितली की, माझ्या कडे आपेगाव येथील कोतवाल श्री. सोमनाथ कोल्हे यांनी माझ्या शेतीचे वाटणी पत्र तलाठी साहेबांकडुन करुन देतो त्या करिता मला दहा हजार रुपये द्यावे लागतील नसता पैठण येथे रजिस्ट्री ऑफिस येथुन काम करुन घे असे कोतवाल यांनी सांगितले त्यावरुन मला पोनि गुसिंगे साहेब एसीबी ऑफिस यांचा फोन आल्याने मी त्यांना माझ्या तक्रारीची माहीती दिली होती परंतु दोन दिवस सुटी असल्याने मी पोनि गुसिंगे यांना दिनांक 04/08/2025 रोजी फोन करुन बोलाविले होते.

आज दिनांक 04/08/2025 रोजी पोलीस निरीक्षक श्री. चैनसिंग गुसिंगे सोबत पोलीस निरीक्षक श्री. बांगर, पोअ/नंदिले, पोअं/हिवाळे चालक पोअं/बागुल व दोन शासकीय पंच असे आपेगाव येथे सुरक्षीत ठिकाणी हजर झाले. त्यानंतर मी पोनि गुसिंगे यांना दोन पंचासमक्ष माझी तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन दिली की, " मी दिनांक 01/08/2025 रोजी अँटी करप्शन ऑफिस येथील लँडलाईन नंबर 02402334045 यांचेवर फोन करुन माझ्या कडे आपेगाव येथील कोतवाल श्री. सोमनाथ कोल्हे यांनी माझ्या शेतीचे वाटणी पत्र तलाठी साहेबांकडुन करुन देतो त्या करिता मला दहा हजार रुपये द्यावे लागतील नसता पैठण येथे रजिस्ट्री ऑफिस येथुन काम करुन घे असे कोतवाल यांनी सांगितले याबाबत पोनि गुसिंगे साहेब एसीबी ऑफिस यांना कळविले होते.

त्यावरुन आज दिनांक 04/08/2025 रोजी पोनि गुसिंगे साहेब हे त्यांचे पथकासह हजर झाल्याने मी माझ्या शेती वाटणी पत्राचे कामाचे पेपर हजर केले आहे. मी आज माझ्या कामासाठी आपेगाव चे कोतवाल सोमनाथ कोल्हे व तलाठी सजा कार्यालय आपेगाव यांना भेटण्यासाठी जाणार आहे. त्यांनी मला माझ्या कामासाठी शासकीय फि विरहीत पैशाची मागणी केल्यास त्यांचे वर कायदेशीर कारवाई करावी. मला त्यांना शासकीय फि विरहीत लाच देण्याची ईच्छा नाही.

माझा कोतवाल कोल्हे तसेच तलाठी मोजे आपेगाव सजा यांचेशी कोणताही उसनवारीचा वा तसेच जुने देणे घेणेचा व्यवहार नाही. माझी तक्रार मी स्वतः लिहली आहे ती बरोबर व खरी आहे." वगैरे मजकुराची तक्रार दिली.

माझे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 04/08/2025 रोजी पोलीस निरीक्षक श्री. चैनसिंग गुसिंगे सोबत पोलीस निरीक्षक श्री. बांगर, पोअ/नंदिले, पोअं/हिवाळे चालक पोअं/बागुल व दोन शासकीय पंच शासकीय वाहणाने आपेगाव पैठण येथे आले त्यानंतर श्री. सोमनाथ कोल्हे व तलाठी सजा आपेगाव हे माझे कामासंदर्भाने माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबत मला व पंच क्रमांक यांना आपेगाव सजा कार्यालय ता. पैठण येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. पोनि/गुसिंगे यांनी मला व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. पोनि/गुसिंगे यांचे सुचनेवरुन पोशि/नंदिले यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात सुरक्षीत करुन मला व पंच क्रमांक । यांना श्री. सोमनाथ कोल्हे यांनी सांगितल्याप्रमाणे आपेगाव सजा कार्यालय पैठण येथे क्षीत अडकवून व्हाईस रेकॉर्डर चालु करून मला व पंच क्रमांक 1 यांना श्री सोमनाथ कोल्हे यांनी सांगितल्याप्रमाणे आपेगाव सजा कार्यालय पैठण

येथेमाझेकडील होंडा शाईन मोटारसायकल क्र. MH-20-DW-2659 यावर पाठवले. मी व पंच क्रमांक । असे आपेगाव सजा कार्यालय पैठण येथे गेलो त्याठिकाणी माझी व श्री. सोमनाथ कोल्हे यांची भेट झाली भेटी दरम्यान माझे कामासंदर्भाने चर्चा झाली. श्री. सोमनाथ कोल्हे हे मला म्हणाले की, तुम्ही बोललेले आहे ना आठ हजार त्यावर मी त्यांना काय बोललो. त्यानंतर श्री. कोल्हे यांनी आज पंधरा दिवसात तुम्हाला शब्द दिला ना आज पंधरा दिवसात तुम्हाला सातबारा टाकुन देतो कोणत्याही हालत मध्ये बस आज नोटीस काढा पंधराव्या दिवशी सातबार मंजुर करून तुम्ही रजिस्ट्री करा असे म्हणाले त्यावर मी त्यांना म्हणालो की, किती त्यावर श्री. कोल्हे साहेब म्हणाले की, आठ हजारावर फायनल बस तुम्ही म्हणी येवढ त येवढ असे म्हणाल्याने मी व पंच असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलोत तेथे आल्यानंतर पोनि/गुसिंगे यांचे सुचनेवरुन पोशि/नंदिले यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/गुसिगे, मी, पंच व सापळा पथकतील सदस्याने व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता, श्री. सोमनाथ कोल्हे यांनी 8000/-रुपये लाचेची मागणी केल्याचे मान्य केले.

त्यानुसार पोनि गुसिंगे यांनी मला व दोन्ही पंचांना श्री. सोमनाथ कोल्हे यांचेविरुध्द लागलीच लाचेचा सापळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/गुसिंगे यांनी वेळेअभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/गुसिंगे यांनी सापळा कारवाईसाठी अंथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवून त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवुन नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने मला, पंच व सापळा पथंकास सुचना दिल्या, पोनि/गुसिगे यांनी माझेकडुन सापळा करवाईसाठी लागणारे 8000/-रु ज्यामध्ये 500/-रु दराच्या 16 नोटा घेऊन त्यांचे नंबर व वर्णन पंच क्रमांक-2 यांचे करवी नमुद करुन घेतले व त्यास अँनासिन पावडर लावुन लाचेच्या नोटा माझे पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. पोनि/गुसिंगे यांनी मला श्री. सोमनाथ कोल्हे व तलाठी सजा आपेगाव यांनी लाचेची मागणी केल्यास खिशात ठेवलेल्या लाच रकमेच्या नोटा 8000/-रु. काढुन श्री. सोमनाथ कोल्हे व तलाठी आपेगाव यांना द्याव्यात व त्यानंतर गळ्यात अडकवलेले पांढरे मोठे उपरणे (गमचा) डाव्या हातात घ्यावा असा इशारा नेमुन दिला.

त्यानंतर पोनि/गुसिंगे यांचे सुचनेवरुन पोशि/नंदिले यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे गळ्यात सुरक्षीत अडकवून व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्रमांक-। यांना लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे 8000/-रु. लाच रक्कम श्री. सोमनाथ कोल्हे व तलाठी सजा आपेगाव यांना देण्यासाठी तहसील कार्यालय पैठण येथे रवाना केले. आमचे पाठोपाठ पनि/गुसिंगे, पोनि/बांगर, पोअं/नंदिले, पोअं. हिवाळे, चालक पोअ/बागुल पंच क्र. 2 असे सापळा पथकासह शासकीय वाहणाने येत होते. मी व पंच क्रमांक असे माझेकडील होंडा शाईन मोटारसायकल ने तहसिल कार्यालय पैठण येथे गेलो. त्याठिकाणी श्री. सोमनाथ कोल्हे हे तेथे भेटले त्यांनी मला श्री. बिन्नीवाले तलाठी साहेब यांना त्यांचे मोबाईल वरुन फोन करुन त्यांना डायरेक्ट बोलाना असे म्हणाले, त्यानंतर श्री. सोमनाथ कोल्हे यांनी तलाठी श्री. बिन्नीवाले यांना फोनवर माझ्या कामासंदभाने सांगितले की, "हे पटेल होते त्यांच एक काम होत, आले होते ईथ, तहसिलला होते त्यांना ते वाटणी पत्र करायच आहे भावा-भावाच, मंडळ सरांना भेटले ते, ते म्हणी सरांकडुन टाकुन घ्या म्हणी, हा त्यांना पाचशे रुपयाच्या स्टॅम पेपरवर दिलय आणुन सगळ" असे बोलले. त्यानंतर तलाठी श्री. बिन्नीवाले हे ठिक आहे ना उद्या येणारच आहे मी, मग तिथ भेटुया आपेगावला असे श्री. सोमनाथ कोल्हे यांना बोलले. त्यानंतर मी श्री. बिन्नीवाले साहेब यांना बोललो की, हे भेटले यांच माझ बोलन झाल मग काय आहे ते करुन देवु का यांच्याकड, आता मी राहायला तिकड संभाजीनगर ला आहे. हा, तर हे आठ हजार रुपये यांच्याकडे देवुन टाकतो मग मी, काय करु मग मी असे बोललो असता श्री. बिन्नीवाले तलाठी साहेव यांनी बर आता ते, बर ठिक आहे चालेल, बघु आपण, बर ठिक आहे चालेल, मी बोलतो त्यांना काय आहे ते. ठिक आहे मी भेटतो तुम्हाला थोड्यावेळात, अ. असे फोन वर मला बोलले. त्यानंतर श्री. सोमनाथ कोल्हे हे तहसील कार्यालय पैठण येथे आतमध्ये श्री. बिन्नीवाले तलाठी आपेगाव यांना भेटण्यासाठी गेले त्यानंतर श्री. सोमनाथ कोल्हे यांनी मला फोन करुन तहसील कार्यालयामध्ये श्री. बिन्नीवाले तलाठी आपेगाव यांना भेटण्यासाठी बोलाविले असता मी आत मध्ये एका रुम मध्ये गेलो तेथे श्री. सोमनाथ कोल्हे व खुर्चीवर एक ईसम बसलेले होते. त्यावर श्री. सोमनाथ कोल्हे म्हणाले की, होलसेल आणि होलसेल पावर टिमचे पथक मेन प्रमुख हे, होलसेल जिथुन ऑर्डर निघेल ते फक्त हेच करणार अशी श्री. बिन्नीवाले तलाठी आपेगाव यांचेशी ओळख करुन दिली आणि माझ्या कामासंबंधाने चर्चा केली त्यावर तलाठी श्री. बिन्नीवाले यांनी ठिक आहे तुम्हाला उद्या नोटीस भेटुन जाईल असे कळविले त्यानंतर श्री. सोमनाथ कोल्हे यांनी मला बाहेर जाण्यासाठी सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र. । असे तहसील कार्यालय पैठण येथील मोकळ्या जागेत येवून थांबलो असता काही वेळाने श्री. सोमनाथ कोल्हे हे आले व मला बोलले की, तिकडे चला असे म्हणून माझ्या समोर त्यांनी उजवा हात केला असता मी त्यांना माझ्या पैटचे उजवे खिशात ठेवलेली, रक्कम काढुन त्यांचे समोर धरली व बोललो सोमनाथ भाऊ मोजुन घ्या असे बोललो त्यावर त्यांनी ओके असे म्हणुन

पैसे उजवे हाताने घेवून त्यांचे अंगावरील घातलेल्या शर्टचे डावे खिशात ठेवून दिले त्यानंतर लगेचच मी लाच स्विकारल्या नंतर करावयाचा नेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 16.05 वा. केला. इशारा प्राप्त होताच पोनि/गुसिंगे, पोनि/बांगर, पोअ/नंदिले पोअं. हिवाळे, चालक पोअ/बागुल पंच क्र. 2 असे सापळा पथकातील सदस्य हे तात्काळ तहसिल कार्यालय पैठण येथे हजर झाले. पोनि गुसिंगे यांचे सुचनेवरुन पोशि/ नंदिले यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/गुसिंगे यांनी श्री. सोमनाथ कोल्हे यांना ताब्यात घेवून त्यांची स्वतःची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. पोनि/गुसिंगे यांनी पंच क्रमांक- यांना पंच क्रमांक 2 श्री. चे समक्ष विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्रमांक यांनी सांगितले की, " श्री. सोमनाथ कोल्हे यांनी त्यांचे फोनवरुन तलाठी आपेगाव यांना फोन करुन सांगितलेप्रमाणे 8,000/- रूपये लाच रक्कम उजवे हाताने स्विकारुन स्वतःचे अंगावरील शर्टचे डावे बाजुचे खिशात ठेवली आहे." असा खुलासा पंच क्रमांक । यांनी केला. पोनि/गुसिगे यांनी श्री. सोमनाथ कोल्हे यांना 8000/-रु. लाच रकमे बाबत विचारणा केली असता त्यांनी अंगावरील शर्टचे डावे बाजुचे खिशात ठेवली आहे असे सांगितले. पोनि/गुसिगे यांनी सदरची लाच रक्कम पंच क्रमांक 2 यांना त्यांचे ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले असता, पंच क्रमांक 2 यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे कळवले. पोनि/गुसिगे यांनी सदरच्या नोटा पंच क्रमांक 2 यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतले. पोनि/गुसिगे यांनी श्री. सोमनाथ कोल्हे यांना माझे कामासंदर्भातील कागदपत्राबाबत विचारणा केली असता त्यांनी तलाठी आपेगाव यांचे कडे तहसील कार्यालयातील नैसर्गीक आपत्ती या कार्यालयात घेवुन गेले तेथे पोनि/गुसिगे यांनी श्री. सोमनाथ कोल्हे व तलाठी आपेगाव यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव सोमनाथ राघु कोल्हे, वय 38 वर्ष, व्यवसाय कोतवाल आपेगाव रा. आपेगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर व अक्षय बबनराव बिनीवाल वय 30 वर्ष व्यवसाय नौकरी ग्राम महसूल अधिकारी सजा आपेगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर (वर्ग-3) असे सांगीतले पोनि/गुसिगे यांनी श्री. सोमनाथ कोल्हे व श्री. अक्षय बिन्नीवाले ग्राम महसुल अधिकारी सजा आपेगाव यांनी माझ्या कागदपत्रांची फाईल काढून दिलेने कागदपत्रांची फाईल ताब्यात घेतली. त्यानंतर पोनि/गुसिगे यांनी घटनास्थळावर प्राथमीक कारवाई करुन पुढील कारवाई एम.आय.डी.सी.पैठण पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे करण्यात येणार असल्याचे सांगीतले, सदर गुन्हयातील फिर्याद मोठी असल्याने एफआयआर कॉलममध्ये पुर्ण बसत नसल्याने पुढील पानावर घेतली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

MAHADEV BABRUWAN GOMARE(I (Inspector)) / 17101005810MBGM8101|

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

त्यानंतर मी, प्रोनि/गुसिंगे, पोनि/बांगर, सापळा पथकातील सदस्य, दोन्ही पंच, श्री. सोमनाथ कोल्हे व श्री. अक्षय बिन्नीवाले तसेच असे एम. आय.डी.सी.पैठण पोलीस ठाणे येथे आलोत. त्याबाबत दिनांक 04/08/2025 रोजी लाचमागणी पडताळणी, सापळापूर्व व यशस्वी सापळा कारवाईचा एकत्रीत सविस्तर पंचनामा केला आहे. त्यांनतर पोनि/गुसिंगे यांनी मला घडलेले घटनेची सर्व हकिगत सविस्तर सांगुन त्याप्रमाणे फिर्याद द्यावी असे सांगीतल्याने मी वरील प्रमाणे घडलेल्या घटनेबाबत पोनि बांगर यांचे समक्ष माझी फिर्याद कथन केली त्याप्रमाणे टंकलिखीत करण्यात आलेली आहे. श्री. सोमनाथ कोल्हे व श्री. अक्षय बिन्नीवाले, ग्राम महसूल अधिकारी सजा आपेगाव यांनी माझे मौजे अगर नांदुर ता. पैठण शिवार शेत गट नं. 58 मध्ये शेतजमीणीची वाटणी पत्र तयार करुन देण्यासाठी माझ्याकडे श्री. सोमनाथ कोल्हे यांनी 8000/-रुपये लाचेची मागणी करुन श्री. अक्षय बिन्नीवाले ग्राम महसुल अधिकारी आपेगाव सजा यांनी सदरची लाच रक्कम सोमनाथ कोल्हे यांना स्विकारण्यासाठी समंती व प्रोत्साहण देवून लाच रक्कम दिनांक 04/08/2025 रोजी 16.05 वा. श्री. सोमनाथ कोल्हे, कोतवाल आपेगाव सजा ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर यांनी पैठण तहसील कार्यालय येथे पंचासमक्ष स्वतः स्विकारली असता, श्री. सोमनाथ कोल्हे यांना लाचेच्या रकमेसह पकडले आहे. म्हणुन माझी 1) सोमनाथ राघु कोल्हे, वय 38 वर्ष, व्यवसाय कोतवाल आपेगाव रा. आपेगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर, 2) अक्षय बबनराव बिनीवाल वय 30 वर्ष व्यवसाय नौकरी ग्राम महसूल अधिकारी सजा आपेगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर (वर्ग-3) यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहता बरोबर व - खरी आहे.

Shuker

Rajesh

**पोलीस ठाणे अंमलदार**
**पोलीस स्टेशन पैठण**
**जि. छत्रपती संभाजीनगर(ग्रा)**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): MAHADEV BABRUW
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 17101005810MBGM81

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन पैठण
जि.छत्रपती संभाजीनगर(ग्रा)